## प्रेस नोट

दि.३०/०१/२०२३

येऊर येथील वन परिमंडळ अधिकारी, विकास शांताराम कदम यांना लाच स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :– | वर्तकनगर पोलीस स्टेशन, ठाणेशहर<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र.४१/१७.१५ वा. दि.३०.०१.२०२३ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | १) लोकसेवक विकास शांताराम कदम वय:– ५० वर्षे, पद:– वन परिमंडळ अधिकारी, संजय गांधी राष्टीय उदयान, वनक्षेत्र, येऊर<br>(वर्ग– ३) |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ६०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ६०००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | दिनांक २३.०१.२३ रोजी यातील तक्रारदार यांचेकडील मुरूम मातीची गाडी येऊर टेकडीवर जावू देण्यासाठी, येऊर येथील वन परिमंडळ अधिकारी विकास कदम यांनी, त्यांचेकडे प्रत्येक गाडीचे रूपये ६००/– प्रमाणे एकूण १० गाडयांची मुरूम माती येऊर टेकडीवर टाकण्याकरीता एकूण ६,०००/–रूपये मागितले व सदरची रक्कम दोन–तीन दिवसात घेवून येण्यास सांगितले.<br>परंतु तक्रारदार यांना लोकसेवक विकास कदम यांना लाच दयावयाची नसल्याने त्यांनी दिनांक २५/०१/२०२३ रोजी लोकसेवक विकास कदम हे ६०००/–रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.३०.०१.२०२३ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक विकास शांताराम कदम, वन परिमंडळ अधिकारी, येऊर जि.ठाणे वर्ग–३, यांनी तक्रारदार यांचेकडे रू.६,०००/–लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर, लगेचच लाचेच्या सापळयाचे आयोजन केले असता, लोकसेवक विकास शांताराम कदम यांना उपवन तलावाच्या मेनगेटजवळ तक्रारदार यांचेकडून रु.६,०००/– (सहा हजार रुपये) इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता, रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले असून लाचेची रक्कम लोकसेवक यांचेकडून हस्तगत करण्यात आली आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.सुनिल लोखंडे, सो.पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**मा.श्री.अनिल घेरडीकर सो.अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

(स्वप्निल जुईकर)
पोलीस निरीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, ठाणे.

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे